आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
३ फेब्रुवारी २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- भारत-अमेरिका व्यापार करार सर्व भारतीयांच्या हिताचा असल्याचं सरकारचं प्रतिपादन, उद्योग जगताकडून कराराचं स्वागत

- भारत-अमेरिका व्यापार करारामुळं शेअर, सराफा आणि परकीय चलन बाजारात दमदार तेजी

- बेशिस्त वर्तनाबद्दल लोकसभेतले काँग्रेसचे ७ आणि माकपच्या एका खासदाराचं अधिवेशन कालावधीसाठी निलंबन

**आणि**

- अमेरिकेसोबत चर्चा करण्याचे इराणच्या अध्यक्षांचे परराष्ट्र मंत्र्यांना आदेश

**<><><><><>**

भारतातून अमेरिकेत निर्यात होणाऱ्या मालावरचं आयातशुल्क २५ टक्क्यांवरुन कमी करुन १८ टक्क्यांवर आणण्याचं, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी मान्य केल्याची, घोषणा आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर केली. ही भारताच्या जनतेची ताकद आहे, असं त्यांनी म्हटलं आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांनीही याबाबत समाज माध्यमावर संदेश प्रसारित केला आहे. भारतीय उत्पादनांवर अमेरिकेत आयात शुल्क २५ टक्क्यांवरून १८ टक्क्यांपर्यंत कमी केलं जाणार आहे. या संदर्भातल्या व्यापार करारावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली असल्याचं ट्रम्प यांनी म्हटलं आहे. भारत रशियाकडून तेल खरेदी थांबवणार असून यापुढं अमेरिकन मालावर भारतात लागणारं शुल्क उतरत्या क्रमानं शून्यावर पोहोचेल अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार करार हा भारताचं भवितव्य सुनिश्चित करणारा करार असून यामुळे प्रत्येक भारतीयाचं हित साधलं जाईल, असा विश्वास वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी व्यक्त केला. ते आज नवी दिल्ली इथं वार्ताहर परिषदेत बोलत होते.

या करारामुळे भारताचं जागतिक अर्थव्यवस्थेतलं स्थान पक्कं होईल, असं गोयल म्हणाले. या कराराद्वारे शेतकऱ्यांचं हित जपण्यात आलं असून कृषी, दुग्धविकास, पशुपालन आदी क्षेत्रांना फायदा होणार आहे, असं त्यांनी सांगितलं.

**- - होल्ड बाईट गोयल - -**

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगासाठी हा व्यापार करार महत्त्वाचा असल्याचं गोयल यांनी नमूद केलं. अभियांत्रिकी क्षेत्र, वस्त्रोद्योग, चर्मोद्योग आणि पादत्राणे, ज्वेलरी, रबर, नैसर्गिक रसायने, मासेमारी या सर्व क्षेत्रांमधे मोठ्या प्रमाणात संधी निर्माण होणार असल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं. हा करारा भारतासाठी आतापर्यंतचा सर्वात फायदेशीर करार असून यामुळे जागतिक पातळीवरचं भारताचं स्थान अधोरेखित झाल्याचं गोयल म्हणाले.

**<><><><><>**

सीआयआय, फिक्की, रत्न आणि आभूषण उद्योग, PHDCCI, मोबाईल फोन्स, इलेक्ट्रॉनिक्स वस्तू आणि संलग्न उत्पादनांच्या निर्यातदारांची संघटना ICEA,मत्स्योत्पादकांची संघटना, वैद्यकीय उपकरणं आणि औषध निर्मात्यांनी आणि व्यापारी संघटनांनी या कराराबद्दल आनंद व्यक्त केला असून यामुळे भारतीय उत्पादनांना अमेरिकेत उठाव मिळेल असा विश्वास व्यक्त केला आहे.

आयात शुल्क कमी केल्यामुळे भारत आणि अमेरिका यांच्यातले धोरणात्मक आणि आर्थिक संबंध वाढीस लागतील असं आदित्य बिर्ला समुहाचे अध्यक्ष कुमार मंगलम बिर्ला यांनी म्हटलं आहे.

या करारामुळे देशासाठी विकासाचं नवं दालन उघडेल असा विश्वास भारती उद्योग समुहाचे संस्थापक सुनील मित्तल यांनी व्यक्त केला.

भारत-अमेरिका व्यापार करार हा भारतीय वैद्यकीय तंत्रज्ञान आणि औषध निर्माण क्षेत्राला कलाटणी देणार ठरेल असं उद्योग क्षेत्रातल्या तज्ज्ञांनी म्हटलं आहे. यामुळे आपल्या उत्पादकांना प्रोत्साहन मिळेल, स्पर्धात्मकता वाढीस लागेल, गुंतवणुकीला चालना मिळेल आणि रोजगार निर्मिती होईल, असं असोसिएशन ऑफ इंडियन मेडिकल डिव्हायसेस या संस्थेनं म्हटलं आहे.

**<><><><><>**

भारत-अमेरिका व्यापार कराराच्या घोषणेमुळे देशातल्या शेअर आणि सराफा बाजारात आज घसघशीत तेजी दिसून आली. याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून---

**- - - होल्ड व्हाइस कास्ट**

व्यवहार सुरू झाले तेव्हाच सेन्सेक्स ४ हजारांहून अधिक आणि निफ्टी बाराशेहून अधिक अंकांनी वधारला. व्यवहारादरम्यान सेन्सेक्स ८६ हजारांच्या पातळीजवळ आणि निफ्टी २६ हजारांच्या वर गेला होता. त्यानंतर बाजार स्थिरावले आणि दिवसअखेर सेन्सेक्स २ हजार ७३ अंकांची वाढ नोंदवून ८३ हजार ७३९ अंकांवर बंद झाला. निफ्टी ६३९ अंकांची तेजी नोंदवून २५ हजार ७२८ अंकांवर बंद झाला. या व्यापार करारामुळं फायदा होणाऱ्या क्षेत्रातल्या कंपन्यांचे समभाग आज मोठ्या प्रमाणात वधारले. या करारामुळं परदेशी संस्थात्मक गुंतवणूक वाढेल या आशेनेही बाजारात तेजी दिसून आली. डॉलरच्या तुलनेत रुपया आज १ रुपया २२ पैशांनी वधारुन ९० रुपये २७ पैशांवर स्थिरावला.
सोन्या-चांदीतही गेल्या ४ दिवसांपासून असलेल्या जोरदार घसरणीला आज विराम दिला. दिवसअखेर मुंबईच्या सराफा बाजारात सोनं पावणे ३ हजार रुपयांनी वधारलं. एक तोळा २४ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५६ हजार आणि एक तोळा २२ कॅरेट सोन्यासाठी १ लाख ५२ हजार रुपयांपेक्षा अधिक रक्कम ग्राहकांना आज मोजावी लागत होती. १ किलो चांदी आज सुमारे साडे ४ हजार रुपयांनी महाग झाली आणि चांदीचे दर २ लाख ७२ हजार रुपयांच्या जवळ पोहोचले.

**<><><><><>**

लोकसभेत बेशिस्त वर्तन केल्याबद्दल विरोधी पक्षांच्या आठ खासदारांना अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या उर्वरित काळासाठी सभागृहातून निलंबित करण्यात आलं आहे. यात भंडारा गोंदियाचे प्रशांत पडोळे यांच्या सह काँग्रेसच्या सात तर माकपच्या एका खासदाराचा समावेश आहे.

लोकसभेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या चर्चेदरम्यान विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आज पुन्हा एकदा चीनचा मुद्दा उपस्थित केल्यानंतर झालेल्या गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दुपारी तीन वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. युरोपियन युनियन आणि अमेरिका यांच्यासोबतच्या व्यापार कराराचा मसुदा सभागृहाच्या पटलावर ठेवावा

अशी मागणीही विरोधकांनी लावून धरली. गदारोळामुळे सभापतींनी कामकाज तीन वेळा तहकूब केलं. दरम्यान सभापतींच्या आसनाकडे कागद भिरकावणाऱ्या सदस्यांच्या विरोधात संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी मांडलेला या खासदारांच्या निलंबनाचा प्रस्ताव लोकसभेत आवाजी मतदानानं मंजूर झाला. त्यानंतर सभागृहाचं कामकाज उद्या सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

<><><><><>

राज्यसभेत आज राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरच्या आभार प्रस्तावावर चर्चा पुन्हा सुरू झाली. चर्चेत भाग घेताना भाजपचे घनश्याम तिवारी म्हणाले की, नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार २०२७ पर्यंत भारताला विकसित राष्ट्र बनवण्यासाठी काम करत आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे, असं वायएसआर काँग्रेसचे खासदार गोल्ला बाबूराव म्हणाले. जागतिक स्तरावर भारताचे दरडोई उत्पन्न खूप कमी असून राष्ट्रपतींच्या अभिभाषणात देशाच्या वास्तवाचं प्रतिबिंब दिसत नाही, असं काँग्रेस खासदार रजनी पाटील म्हणाल्या.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी येत्या ६ फेब्रुवारीला होणाऱ्या परीक्षा पे चर्चा या विशेष भागाच्या प्रसारणासाठी आज नागरिकांना आमंत्रण दिलं. शुक्रवारी सकाळी १० वाजता डीडी न्यूज आणि युट्युबवर या कार्यक्रमाचं प्रसारण होईल. यंदाच्या परीक्षा हंगामापूर्वी त्यांनी देवमोगरा, कोइम्बतूर, रायपूर, गुवाहाटी आणि दिल्लीत लोककल्याण मार्ग इथे निवडक विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता.

<><><><><>

सी-टीईटी, अर्थात केंद्रीय शिक्षक पात्रता परीक्षा’ देणाऱ्या शिक्षकांना जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या कामातून सूट देण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर झाल्यामुळे या निवडणुकांसाठी ५ फेब्रुवारीऐवजी ७ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. त्याचवेळी ही परीक्षा असल्यामुळे संबंधित शिक्षकांना निवडणूक कर्तव्यातून सूट देऊन, पर्यायी व्यवस्था करण्याचे निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले आहेत.

**<><><><><>**

ग्राहकांचा डेटा गोळा करण्याच्या नावाखाली नागरिकांच्या माहितीच्या खासगीपणाचा हक्क हिरावून घेता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयाने बजावलं आहे. मेटा आणि व्हॉट्सअ‍ॅपने भारतीय स्पर्धा आयोगाने लावलेल्या दंडाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिलं आहे. त्याची सुनावणी आज सुरु झाली.

**<><><><><>**

मणिपूरमध्ये वाय. खेमचंद सिंग यांची भाजपाच्या विधीमंडळ नेतेपदी निवड झाली आहे. आज रात्री होणाऱ्या एनडीएच्या घटक पक्षांच्या बैठकीत एनडीएच्या विधीमंडळ नेतेपदी त्यांची निवड होण्याची शक्यता आहे. गेल्यावर्षी १३ फेब्रुवारी मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट सुरू आहे. ६० सदस्यीय मणिपूर विधानसभेत भाजपाचे ३७ आमदार आहेत.

**<><><><><>**

अमेरिकेसोबत समान भूमिकेतून आणि उचित वाटाघाटी कराव्यात अशा सूचना परराष्ट्र मंत्र्यांना दिल्या असल्याचं इराणचे अध्यक्ष मसूद पझेस्कियन यांनी आज सांगितलं. इराणचे सर्वोच्च नेते अयातोल्ला अली खामेनी यांनी आधी चर्चेला नकार दिला होता. दोन्ही देशांमध्ये चर्चा व्हावी यासाठी तुर्कस्तानने मध्यस्थी केल्याची चर्चा आहे.

**<><><><><>**

महिला प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा एलिमिनेटर सामना गुजरात जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स या संघांमध्ये बडोद्यात सुरू आहे. दिल्लीच्या संघानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे. गुजरातची फलंदाजी गडगडली असून शेवटची बातमी हाती आली तेव्हा गुजरातच्या संघाच्या ७ षटकं आणि २ चेंडूंत ३ खेळाडू बाद ५६ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**